2 3 FEB 2023 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुभवांची गोष्ट म्हणजे कविता : सौमित्र

कोल्हापूर : प्रतिनिधी

कविता सुचण्याचा एक क्षण असतो. आपली कविता, कादंबरी, जगणं हे शोधता आलं पाहिजे. सतत कविता तुमच्यासोबत असेल तर ती आपल्या जगण्यात उतरते, अशी भूमिका मांडून अनेक अनुभवांचा अंतर्भाव असणारी गोष्ट म्हणजे कविता, असे प्रतिपादन महाराष्ट्रातील नामवंत अभिनेते व कवी सौमित्र यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात आयोजित 'मी आणि माझी कविता' या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे होत्या.



कोल्हापूर : 'मी आणि माझी कविता' या कार्यक्रमात बोलताना अभिनेते व कवी सौमित्र. सोबत डॉ. रणधीर शिंदे, डॉ. मेघा पानसरे.

सौमित्र म्हणाले, कवितापण काय असते हे कधी कळले नाही; पण कवितेतील लय मात्र मला आवडत असे. या जाणिवेपासूनचा प्रवास कथन करत कवितासदृश म्हणजे काहीतरी आहे याची जाणीवच आयुष्य समृद्ध करते. आवडते कवी पुन्हा पुन्हा वाचले तर स्वतःमधील कवीचा शोध लागतो.

प्रास्ताविकात डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, नवीन काहीतरी सुचण्यासाठी पाश्चात्त्य व भारतीय भाषेतील वाचन खूप महत्त्वाचे आहे. या कार्यक्रमास प्रा. प्रभंजन माने, प्रा. प्रमोद कसबे, अर्चना पाटील आदी उपस्थित होते. आभार डॉ. तेजस चव्हाण यांनी, तर सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले.

पुढारी

# विद्यापीठ परीक्षा सुरळीतपणे पार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने हिवाळी सत्रात सुरू असलेल्या पदवी व पदव्युत्तर विभागाच्या १६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेसाठी ३१७ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाच्या ५० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने बुधवारपर्यंत विविध ५० अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. त्यात पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या मंडळातर्फे आयोजित एकूण १६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा बुधवारी झाल्या. त्यात एमबीए., एम. ए., बीजेसी., एम. एस्सी., डिप्लोमा इन रशियन लॅंग्वेज, आदी अभ्यासक्रमांचा समावेश होता. त्यासाठी एकूण ३१७ विद्यार्थी उपस्थित होते. दिवसभरात बी. एस्सी., फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, बॅचलर ऑफ बॅंक मॅनेजमेंट, बी. एस्सी. फूड टेक्नालॉजी अँड मॅनेजमेंट, बी. ए. इन ड्रेस मेकिंग अँड फॅशन को-ऑर्डिनेशन अशा अन्य १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे ऑनलाईन निकाल जाहीर केले आहेत. परीक्षा अंतिम टप्प्यात असून सर्व निकाल लवकरात लवकर जाहीर करण्याच्यादृष्टीने काम सुरू असल्याचे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

Times of India

# Non-teaching staff call off protest

Times News Network

**Kolhapur**: The daily hustle and bustle returned to the premises of Shivaji University Kolhapur on Wednesday as the non-teaching staff of Maharashtra State University and College Employees Joint Action Committee called off their protest, which was ongoing for the last 20 days.

After receiving some assurances from the state government the committee decided to suspend the agitation till March 10 to give time to the state government to fulfil the demands.

Accordingly, all the members and employees of Shivaji Vidyapeeth Sevak Sangh' returned to work on Wednesday. Work in the university came to a standstill on Monday and Tuesday due to the indefinite strike.

Chief coordinator of the committee Milind Bhosale said, "The committee received some assurances from the higher and technical education department of the government on Tuesday according to the discussion held with deputy chief minister Devendra Fadnavis. After that, there was an online meeting of the office bearers of the joint action committee on Tuesday night in which it was decided to suspend the agitation till March 10."

Fadnavis appealed to the committee to give time to the government to take action regarding the fulfilment of the demands, Bhosale said.

The proposal for approval of these two demands — the reintroduction of the Assured Progression Scheme under Revised Service and the 58 months pay the difference of the seventh pay commission increment — is in the final stage.